मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

मंत्रालय (मुख्य इमारत), तळमजला, अभिलेख कक्ष क्र.२२,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दूरध्वनी क्र. - ०२२-२२०२५६०८ Email ID: tca-est@mah.gov.in

**क्रमांक :** संकीर्ण २०२५/प्र.क्र.११०/आस्थापना **दिनांक:** ०६ सप्टेंबर, २०२५

# जाहिर सूचना

सांस्कृतिक कार्य विभाग मंत्रालय, मुंबई या विभागाशी संबंधित अधिनियमातील सुधारणांसंदर्भात सल्ला देण्याकरिता तसेच विभाग आणि विभागाच्या अधिनस्त असलेल्या ९ क्षेत्रिय कार्यालयांची न्यायालयीन प्रकरणे (मा.दिवाणी/फौजदारी न्यायालय/मा. उच्च न्याचालय / मा. सर्वोच्च न्यायालय इ.) हाताळण्यासाठी **(दोन) वकीलांची** पॅनलवर नेमणूक करावयाची आहे. यासाठी विभागाने पॅनलवरील वकीलांच्या फी चे दर पुढीलप्रमाणे निश्चित केलेले आहेत:-

| अ.क्र. | तपशील | रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १. | कायदेविषयक लेखी अभिप्राय. (प्रति प्रकरण) | २५००/- |
| २. | याचिकेचा मसूदा तयार करणे. (Written Statement) (प्रति प्रकरण) | ७५००/- |
| ३. | लिखीत जबाब तयार करणे. (प्रति प्रकरण) | ७५००/- |
| ४. | न्यायालयीन दाखल करावयाच्या प्रतिज्ञापत्राचे लेखन. (प्रति प्रकरण) | ७५००/- |
| ५. | संकिर्ण (प्रति प्रकरण) | २०००/- |
| ६. | कॅव्हेट फाईल करणे | २०००/- |
| ७. | कायदे विषयक बाबींसंबंधीत बैठक भत्ता | १०००/- |

उपरोक्त दर मान्य असणारे व खालील नमूद आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या विधिज्ञ यांचेकडून दि.३०.१०.२०२५ पर्यंत विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे. विहित नमुन्यातील अर्ज हे उप सचिव (आस्थापना), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या कार्यालयात समक्ष अथवा पोस्टाने बंद लखोट्यात दि.३०.१०.२०२५. (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) सादर करण्यात यावेत.

- ## आवश्यक शैक्षणिक अर्हता:-

१. विधिज्ञाकडे मान्यता प्राप्त विद्यापिठाची विधि शाखेची पदवी असणे आवश्यक आहे.

२. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास विधिज्ञाचे वय किमान ३५ वर्ष व कमाल ६२ वर्ष असावे.

३. विधिज्ञाकडे सनद प्राप्त झाल्यानंतर कमीतकमी १० वर्षाचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव असावा.

४. मा. सर्वोच्च न्यायालयात / मा. उच्च न्यायालयात /मा. दिवाणी/मा. फौजदारी शासकीय प्रकरणे हाताळण्याचा अनुभव असलेल्या विधिज्ञांना प्राधान्य देण्यात येईल.

- ## अटी व शर्ती:-

१. सदर विधिज्ञ फी चे दर विधिज्ञाची विभागाकरिता पॅनलवर नियुक्ती केलेल्या दिनांकापासून लागू करण्यात येतील.

२. सदर विधिज्ञांनी न्यायालयीन प्रकरणात केसचा निकाल विभागाच्या/कार्यालयाच्या बाजूने लागण्याच्या दृष्टीने विभागाला वेळोवेळी मार्गदर्शन करणे आवश्यक राहील.

३. न्यायालयीन प्रकरणी आवश्यकता भासल्यास विभागास कायदेशीर लेखी सल्ला देणे तसेच क्षेत्रिय कार्यालयातील विभाग प्रमुखांना परिच्छेद निहाय अभिप्राय देण्यास योग्य ते सहकार्य करणे आणि प्रस्तुत प्रकरणी न्यायालयात घडलेल्या घटनांबाबत त्यांना माहिती अवगत करणे आवश्यक राहिल.

४. विधिज्ञ यांनी त्यांच्याकडे सोपवलेल्या कामाबाबत अहवाल सादर केल्यावर तो अहवाल विभागामार्फत तपासून प्रमाणित केल्यानंतर वरील फी तक्त्यानुसार त्यांना संबंधित कार्यासनाकडून शुल्क अदा केले जाईल.

५. सदर विधिज्ञांची नियुक्ती प्रथम १ वर्षासाठी असेल व काम समाधानकारक आढळल्यास पुढील मुदतवाढीचे सर्व अधिकार मा. सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

६. कोणतीही पूर्वसूचना न देता अर्ज स्वीकारणे, नाकारणे, पुर्ण प्रक्रीया रद्द करणे तसेच अटी शर्ती मध्ये बदल करणे याबाबततचे सर्व अधिकार मा. सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांना राखून ठेवलेले आहेत.

- ## अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे:

१. मान्यताप्राप्त विद्यापीठाची विधी शाखा पदवी/पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र आवश्यक.

२. बार कौन्सिल सनदची प्रत.

३. मा. सर्वोच्च न्यायालयात/मा. उच्च न्यायालयात/मा. कामगार/मा. दिवाणी/मा. फौजदारी न्यायालयात हाताळलेल्या शासकीय प्रकरणांचे विवरणपत्र. (न्यायालयातील आदेशाच्या प्रथम पृष्ठ व आदेशाच्या प्रतीसह)

४. वयाच्या पुराव्यासाठी माध्यमिक शाळा सोडल्याचा दाखला किंवा समकक्ष पुरावा.

५. उमेदवाराचे पॅनकार्ड

६. उमेदवाराचे आधारकार्ड.

**(गिता यादव)**
**प्र. अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

निवडनस्ती (आस्थापना)

# अर्जाचा नमुना

विधि अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज

उमेदवाराने अलीकडील काळातील
स्वत:चे छायाचित्र येथे चिटकवावे

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव :-..................................

२. अर्जदाराचा संपूर्ण पत्ता:-.............................................

३. भ्रमणध्वनी क्रमांक:-................

४. जन्म दिनांक :-...............

५. विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय? :- होय/नाही
   अर्हतेचा तपशिल:-

६. अनुभव

| अ.क्र. | यापूर्वी काम केलेल्या विभागाचे/ कार्यालयाचे नाव व पत्ता, संपर्क क्र. | कालावधी | कामाचे स्वरुप/विषय |
|---|---|---|---|
| | | | |

विशेष उल्लेखनीय काम:-

ठिकाण:-
दिनांक:-

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी